महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५४ /२०२३ दि. ५ /०४/२०२३

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यक्षेत्रात कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. रिलायन्स अस्टाल्डी जॉइन्ट व्हेंचर या कंपनीकडून मुंबई मेट्रो लाईन–४ चे कासारवडवली ते गायमुख पर्यत काम चालू आहे. सदर मेट्रोच्या पिलरवर गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** घोडबंदर ते ठाणे वाहिनीवर विजय गार्डन सिग्नल ते वाघबिळ ब्रिज दरम्यान मेट्रोचे काम करीत असताना घोडबंदर ठाणे वाहिनी जड अवजड वाहनांचे वाहतुकीस बंद करण्यात येणार असल्याने, सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **एस. एस. बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) गुजरात महामार्गाने ठाणे घोडबंदर रोडच्या दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद –** २) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणा–या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **फाऊंटन हॉटेल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** गुजरात, मुंबई, विरार, वसई कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणारी सर्व प्रकारची जड अवजड वाहने चिंचोटी नाका येथून कामण, अंजुर फाटा, माणकोली भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**जड अवजड वाहने सोडून इतर वाहने आनंदनगर सिग्नल कट जवळ डावे बाजूस वळण घेवून सेवा रस्त्याने वाघबीळ नाका जवळ उजवे बाजूस वळण घेवून मुख्य रस्त्यास मिळून पुढे इच्छित स्थळी जातील.**

१) दि. ०७/०४/२०२३ रोजी ००:०१ ते ०५.०० वाजेपर्यंत.
२) दि. ०८/०४/२०२३ रोजी ००:०१ ते ०५.०० वाजेपर्यंत.
३) दि. ०९/०४/२०२३ रोजी ००:०१ ते ०५.०० वाजेपर्यंत.
४) दि. १०/०४/२०२३ रोजी ००:०१ ते ०५.०० वाजेपर्यंत.
५) दि. ११/०४/२०२३ रोजी ००:०१ ते ०५.०० वाजेपर्यंत.

सदरची वाहतूक अधिसूचना ही वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होई पर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( एस. एस. बुरसे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मीरा भाईंदर
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतूक विभाग
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत:–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner